**महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा परीक्षा-२०१८ मधून नियुक्त झालेल्या साहायक अभियंता, श्रेणी-१ (स्थापत्य), गट-अ यांचा परिवीक्षा कालावधी समाप्त करणेबाबत.....**

# महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- परिवी-२०२४/प्र.क्र.१०/आ(संनि),

तिसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक :- ०५ एप्रिल, २०२४**

**वाचा** - १) शा.नि.क्र.नियुक्ती-२०२०/प्र.क्र.०१/आ(संनि) , दिनांक २७.११.२०२०

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परिवि-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दिनांक २५.०८.२०१५

## <u>शासन निर्णय</u>

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णय दि.२७.११.२०२० अन्वये महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा वर्ग-१ मध्ये खालील नमूद उमेदवाराची सहायक अभियंता श्रेणी-१ या (गट-अ) या पदावर दोन वर्षाकरीता परिवीक्षाधीन उमेदवार म्हणून नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२. खाली नमूद सहायक अभियंता श्रेणी-१ ( स्थापत्य ) (गट-अ) यांनी परिवीक्षा कालावधी पूर्ण करण्यासाठी आवश्यक अटी व शर्ती समाधानकारकरित्या पूर्ण केल्या आहेत. संबंधितांविरुध्द शासन स्तरावर विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. यास्तव, संबंधितांचा परिवीक्षा कालावधी त्यांच्या नावासमोर रकाना क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास समाप्त करण्यात येऊन संबंधितांची सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य), गट-अ या पदावरील सेवा पुढे सुरू ठेवण्यात येत आहे.

| अ. क्र. | सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) यांचे नाव | शासन सेवेत रूजू झाल्याचा दिनांक | व्यावसायिक परीक्षेचा कालावधी | घेतलेली रजा (एकूण दिवस) | परिवीक्षा कालावधी संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्रीमती प्राजक्ता अनिल भुजाडले | दि.०१.०१.२०२१ | दि.०९.०८.२०२२ ते दि.१०.०८.२०२२ | दि. २६.०४.२०२२ ते दि.०२.०५.२०२२ या कालावधीत ०७ दिवस अर्जित रजा | दि.०८.०१.२०२३ (म.पू.) या दिनांकास (अर्जित रजेची गणना केल्यानंतरच्या दिवशी) |

३. सदर शासन निर्णय संदर्भांकित क्र.२ येथील शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक परिवि-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दि.२५.०८.२०१५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( बापूसाहेब रा. सोनवणे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) महालेखापाल-१/२, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.
२) अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.
३) मुख्य अभियंता (जलसंपदा), जलसंपदा विभाग, सिंचन भवन, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५.
४) श्रीमती प्राजक्ता अनिल भुजाडले, सहायक अभियंता श्रेणी-१ ( स्थापत्य)), व्दारा : अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड.
५) कार्यासन आ (वर्ग-१)/आ (वर्ग-२)/गोपनीय कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
६) आ (संनि), कार्यासन संग्रहार्थ.